संगीत

20.3.93 लोकसत्ता

स्थित्यंतरांचा वेध घेणारं स्वरचक्र

संगीतशास्त्रज्ञ डॉ. अशोक रानडे यांचं अध्ययन अव्याहतपणे चालू असतं. या अध्ययनाचं फलित म्हणजे संगीताकडे निरनिराळ्या दृष्टिकोनातून पाहणारे विविध कार्यक्रम. डॉ. रानडे यांचा अभ्यास फक्त रागांच्या व्याकरणापुरता मर्यादित नाही. ते संगीताला जन्म देणाऱ्या आणि पोसणाऱ्या संस्कृतीचाही सदयपणे अभ्यास करतात आणि तिचा आस्वाद घेतात. गेल्या पाच वर्षांत रानड्यांच्या या अभ्यासातून नाट्यसंगीत सावन, बैठकीची लावणी, देवगाणी वगैरे उत्तम कार्यक्रम निपजले आहेत. त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केलेला ताजा कार्यक्रम म्हणजे 'स्वरचक्र'. विविध स्थित्यंतरांतही संगीत कलेने कसं नातं जोडलं आहे, याचा अंदाज देणारा कार्यक्रम असं या स्वरचक्राचं वर्णन करता येईल.

सकाळची दुपार होते. दुपारची संध्याकाळ होते. ग्रीष्म ऋतुनंतर वर्षाऋतु येतो. त्यानंतर शिशिर येतो. ही निसर्गातली स्थित्यंतरं. जन्म, जीवन, जरा आणि मृत्यू ही मानवी जीवनातली स्थित्यंतरं. या सर्वांशी संगीतकलेने आपला संबंध जोडला आहे. केवळ रागदारी संगीतानेच नव्हे तर त्यापलीकडे असलेल्या संगीतानेही; हा डॉ. रानडे यांच्या विवेचनाचा मुद्दा होता. त्यानुसार काही रागदारी रचना काही स्त्री गीतं, पाळणे, लावण्या भावगीतं, विराण्या, चिंतनात्मक भजनं वगैरेंची रेलचेल या कार्यक्रमात होती. सरला भिडे, प्रीती भट्ट, शुभा जोशी, श्रुती सडोलीकर, नंदा परचुरे,

सरला भिडे

वंदना, बर्वे, माधव भागवत, कल्याणी पांडे आणि केदार बोडस यांनी या रचना कधी एकट्याने तर कधी समूहाचा भाग म्हणून गायल्या. शुभा जोशी, प्रीती भट्ट, नंदा परचुरे, वंदना आणि कल्याणी पांडे यांची गाणी विशेष उठावदार वाटली. संगीताकडे पाहण्याची नजर देणारा कार्यक्रम म्हणून या कार्यक्रमाचं वर्णन करावं लागेल.

कर्नाटक संघाची 'कलाभारती'

उन्हाळा सुरू झाला आहे आणि मुंबईकरांना जीवघेणा वाटणारा उकाडाही सुरू झाला आहे. अशा वातावरणात एक सुखद बातमी म्हणजे कर्नाटक संघात 'कलाभारती' सुरू झाल्याची. आपल्या आलिशान वातानुकूलित सभागृहात संस्थेतर्फे दर रविवारी सकाळी दहा ते एक या काळात शास्त्रीय संगीत आणि नृत्याची मैफिल भरवण्याची योजना संघाचे पदाधिकारी सदानंद शेट्टी आणि ए. सनदी यांनी नुकतीच जाहीर केली. दर रविवारी श्रोत्यांना संगीताचे अथवा नृत्याचे कार्यक्रम विनामूल्य ऐकायला व पाहायला मिळणं ही एक पर्वणीच म्हटली पाहिजे. येत्या काही आठवड्यात शिवानंद पाटील, अश्विनी भिडे, मिलिंद चित्ताळ वगैरे कलाकारांचे कार्यक्रम होणार आहेत.

भारतात प्रथमच आशियाई रोस्ट्रम

इंटरनॅशनल म्युझिक कौन्सिल या युनेस्कोच्या अधिपत्याखाली 'एशियन म्युझिक रोस्ट्रम' ही संस्था आहे. आशिया खंडातल्या नभोवाणी संस्थांना एकत्र गुंफणारी ही संस्था आहे. दर तीन वर्षांनी या संस्थेची बैठक विविध देशात भरते. यंदा प्रथमच ती मुंबईत भरत आहे. त्यानिमित्त श्रीलंका, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया वगैरे देशांच्या नभोवाणीचे प्रतिनिधी येणार आहेत. विविध देशांतर्फे एक संगीताची धुन पाठवण्यात येते आणि उत्कृष्ट धुनेला बक्षीस दिलं जातं. यापूर्वी बिस्मिल्ला खान, अमजद अली यांनी हा बहुमान पटकावला आहे. यंदा स्पर्धेबरोबरच प्रसारणाच्या भूमिकेसंबंधी, एक परिसंवाद इंडियन मर्चन्टस् चेंबरच्या सभागृहात रविवार दि. २१ मार्च रोजी सकाळी दहा वाजता होणार आहे. आकाशवाणीचे महासंचालक शशिकांत कपूर यांच्या हस्ते या परिसंवादाचं उद्घाटन होईल. सर्व संगीत रसिकांनी त्याला उपस्थित राहावं, असं आवाहन करण्यात आलं आहे.

◆ अमरेन्द्र धनेश्वर

चित्रलेखा - दि. २९ मार्च १९९३.

कलारंग

मराठी संसकृतीची सर्वोत्तम ओळख 'स्वरचक्र'

मराठी संगीताला मराठी संतांनी आणि त्यांच्या रचना ओठावर खेळवत आपला दिवस साजरा करणाऱ्या मराठी महिलांनी फार मोठे सहाय्य केले.

नारायण आठवले

मराठीपासून तुटणाऱ्या मराठी माणसाला जागवून मराठी भाषिकांच्या पुढच्या पिढ्या मराठी भाषिकच राहाव्यात यासाठी मराठीतले, म्हणजे मराठी भाषा, मराठी संस्कृतीतले जे सर्वोत्तम आहे त्याची सर्वांना, निदान नव्या पिढीला ओळख करून देण्याचे उपक्रम हाती घेण्याची जरुरी आहे. नव्या पिढीलाच नव्हे, त्याच्या आईबापांनाही मराठीतल्या अनेक चांगल्या गोष्टींची ओळख आहे असे दिसत नाही. दाखवण्यासारखे खूप काही आहे, पण ते योग्य ताकदीने दाखवण्यासाठी पुढे येणारे फार थोडे आहेत. असे जे कुणी आहेत त्यांच्या सहकार्याने असे जे काही आहे ते लोकांपर्यंत नेण्याचा विचार 'माझी मराठी प्रतिष्ठान' करीत आहे. असा एक कार्यक्रम नुकताच बघायला मिळाला. सुप्रसिद्ध संगीततज्ज्ञ पं. अशोक रानडे यांनी स्वरचक्र नावाचा एक कार्यक्रम एस. एन. डी. टी.च्या एका समारंभात सादर केला. 'मराठी साहित्य, संस्कृती आणि संगीत' यांचे विलक्षण प्रभावी आणि प्रसन्न दर्शन ह्या कार्यक्रमातून घडते, असे कानावर आले. हा कार्यक्रम पुन्हा केव्हा होणार असे रानडे यांना विचारले. जानेवारीत माटुंग्याला कर्नाटक संघात एक कार्यक्रम होणार असल्याचे त्यांनी सांगितले, पण मुंबईतल्या अशांत परिस्थितीने हा कार्यक्रम होऊ शकला नाही. पुन्हा कधी, कुठे हा कार्यक्रम होईलच, हे सांगता येत नाही. कार्यक्रमात भाग घेणाऱ्या सगळयांना पुन्हा एकत्र आणणं कठीण आहे, असं रानडे म्हणाले. मनाला हूरहूर लागली. ऐकायला हवे असे काही हुकणार असे वाटू लागले, पण ५ मार्चला 'टाटा थिएटर'मध्ये हा कार्यक्रम होणार असल्याचे वाचले. ताबडतोब पहिल्यांदा कार्यक्रमाचे तिकीट नक्की केले.

छाया: अनुश्री

'स्वरचक्र'तून अनोखा आनंद देणारे गायक-कलावंत

'स्वरचक्र' चक्रावून टाकणारा सुखद अनुभव

अशोक रानडे यांचा हा कार्यक्रम प्रत्येक मराठी माणसाने ऐकायला हवा. आपल्या मुलांना ऐकवायला हवा. अशोक रानडे परवानगी देतील तर ह्या कार्यक्रमाची ध्वनिफित-चित्रफित काढून 'माझी मराठी प्रतिष्ठान' हा कार्यक्रम ठिकठिकाणी नेईल. हा कार्यक्रम मराठी माणसाला अभिमान वाटावा असाच आहे. महाराष्ट्र हा दक्षिण आणि उत्तर यांच्या मध्यावर आहे. दोन्हीकडून जे घेता येईल ते महाराष्ट्राने घेतले आहे. आपल्याकडे काय नाही हे महाराष्ट्राने जाणले आणि काय घ्यायला हवे हेही जाणले. महाराष्ट्राने कर्नाटकी संगीतातले काही घेतले उत्तर हिंदुस्थानी संगीतातलेही बरेच काही घेतले. ह्यामधून घडलेल्या मराठी संगीताला मराठी संतांनी आणि त्यांच्या रचना ओठावर खेळवत आपला दिवस साजरा करणाऱ्या मराठी महिलांनी फार मोठे सहाय्य केले. अशोक रानडे यांनी या कार्यक्रमासाठी जी गीते-कवने निवडली त्याला खरोखरच दाद द्यायला हवी. काहीतरी वेगळे, आजवर दृष्टीस न पडलेले, ऐकायला न मिळालेले त्यामुळे या कार्यक्रमात ओळखीचे झाले. ह्या कार्यक्रमाला स्वरचक्र असे नाव देण्यात आले होते. चक्र म्हणजे वर्तुळ नव्हे. वर्तुळाला गती नसते. चक्राला गती असते. दिवस-रात्रीचे एक चक्र आहे. जीवनमृत्यूचे एक चक्र आहे. ऋतूंचे एक चक्र आहे. ह्या तीन चक्रांची मानवाला चांगली ओळख आहे. संगीत-साहित्य-कला या सगळयावर ह्या तीन चक्रांचा प्रभाव आहे. ह्या कार्यक्रमाची सुरुवात भूपाळीने झाली. अशोक रानडे यांचे या कार्यक्रमाचे निवेदन हाही एक विशेष होता. संगीत शास्त्राची ओळख घडवत, रागांबत आवश्यक ते सांगत आणि लोकांवर सदैव प्रसन्नता शिंपडत ते गाण्यांमधल्या जागा भरत होते. ही निवेदनाची साथ कार्यक्रमाची रंगत वाढवणारी तर होतीच, पण श्रोत्यांची जाण वाढवणारीही होती. भूपाळीत भूप राग कसा? असा प्रश्न अनेकांना पडतो. राग आणि वेळ यांची सांगड

घातली गेल्याने ठराविक राग, ठराविक वेळातच खुलतात असाही समज आहे; पण राग आणि समय हा संबंध एककाळ नव्हता. तो नंतर जोडला गेला आहे. पंचस्वराधिष्ठित राग हे जुने राग. प्रत्येक गायकीत ते आहेत असे सांगून रानड्यांनी लोकांना संगीताची पहाट अनुभवायला सिद्ध केले आणि सरला भिडे यांनी भूपाळी गाऊन स्वरचक्र सुरू केले. *घनःश्याम सुंदरा, जागो मोहन प्यारे* अथवा *उठी गोपाळजी* या भूपाळ्या नेहमी कानावर येतात, पण अशोक रानड्यांनी *'उठी उठी बा पुरुषोत्तमा'* ही पारंपरिक पण नेहमी कानावर येत नसल्याने नवीन भूपाळी ऐकवली. काही वेगळे अनुभवायला मिळतंय याची सुखद जाणीव त्यातून झाली. भूपाळीपाठोपाठ माधव भागवत आणि केदार बोडस या दोघांनी *'दान पावले दान पावले'* म्हणत मोरपिसांचा मुगुट घालून नाचणारा वासुदेव सादर केला. ह्या दोघांनी मोरपिसांचे मुगुट घातले नव्हते आणि ते नाचतही नव्हते, पण त्यांचे गाणे सुरू झाले आणि आपोआप वासुदेवाचे नाचणे मनात साकारले. त्यांच्या मुगुटातल्या मोरपिसाचा डोळा डोळ्याला भिडला. तुकाराम महाराजांची ही रचना. त्यातल्या शब्दांचा ठेकेदारपणानं ही रचना नाचत गायचीच आहे, हे जाणवत होतं. हा वासुदेव आता विसरायला झालाय. *'देतो तो देव, घेतो तो नर* या देण्याघेण्यात अडसर आणतो तो असूर.' हेही आता विसरायला झालंय. देवाचा प्रतिनिधी म्हणून दान मागणारा, ते स्वीकारणारा आणि दान पावले म्हणत देणाऱ्याचे भले इच्छिणारा वासुदेव हे उजाडल्यापासून सद्विचार मनी रुजवणारे मराठी संस्कृतीचे एक लेणे न जपणे हे कुणाचे काम? अशोक रानडे यांच्या या कार्यक्रमाने जपायला काय हवे याचीही जाणीव जागवली जात होती. दिनचक्राबरोबरच ऋतूचक्राचाही विचार कार्यक्रमात होता. ऋतू वसंत हा कलावंताचा-गायकांचा-प्रेमिकांचा प्रिय ऋतू. अण्णासाहेब रातंजनकर यांची दक्षिणेकडील बसंत रागाची याद देणारी एक बंदिश *'सरस सुगंध फुल खिले'* सरला भिडे यांनी सादर केली आणि मग नंदा परचुरेने 'पाळणा' गाऊन दाखवला. बाळाला झोपवताना आई *'जो जो रे'* का म्हणते? सगळीकडे हा जो जो रे येत नाही. हा जो जो रे ऐकल्यावर बाळाला निज का येते? या अंगाई गीतातून आसपास सारंग राग जाणवतो. संगीत जीवनाशी संबंध कसा जोडतं हे ह्या सगळ्यातून दिसतं. जन्ममृत्यू चक्राचा फेराही संगीताशी-स्वरचक्राशी जोडलाय. सकाळ झाली, वसंत ऋतू झाला, बाळाच्या पाळण्याने जीवनाची सकाळही झाली.

कोळीनृत्य आणि गीतांच्या जाळ्यातून सुटका नाही, असं वाटण्याइतपत वैताग दिला जातो. कुणीही उठावं, चार पोरी, पोरं जमवावी आणि गोमूला कशातही घोळवावी हा प्रकार चाललाय.

हिरवेपणाचा गारवा गीतातून जाणवला

संगीतात दुपार कुठे दिसते का? सकाळचे राग आहेत. सकाळच्या रागाच्या बंदिशीतून सकाळचे प्रसन्न वातावरण प्रगटते. दुपारचा 'फील' देणाऱ्या काही बंदिशी आहेत. त्याकडे जाताना अशोक रानडे वाजीद अली शहाचे दंतकथा वाटावी असे जीवन थोडक्यात उभे करतात. त्यानी नृत्यगायनात केलेल्या प्रयोगांची माहिती देतात आणि मग माधव भागवत माथ्यावर सूर्य आल्यानंतर होणारी तगमग सुचवणारी बंदीश *'तपन लगी धरती, परत धूप दोपहरिया'* सादर करतात. जीवानची दुपार म्हणजे यौवन. यौवन म्हणजेच जीवनाचा वसंत ऋतू. तो मराठी शाहिरांनी जबरदस्त ताकदीने साहित्य संगीतात उभा केलाय. अशोक रानडे अशा चोखंदळ निवडीचे आहेत की, ते सगळ्या सहज आठवणाऱ्या सुंदर लावण्या सोडून देतात आणि अशी जातीवंत चीज आपल्यापुढे मांडतात की, त्या निवडीनेच आपण बेहद्द खूश होऊन जातो. यौवनाचा रंग अर्थातच हिरवा. होनाजी बाळांची हिरव्या रंगाची लावणी हा जणू पाचूचा हारच. शोभा जोशी ही लावणी त्यातल्या शब्दाशब्दांचा रंग खुलवत सादर करते–

हिरवी प्राणसखे बनलीस अरवा
खोवून वेणी मधी मरवाऽ

ह्या हिरवेपणाचा गारवा सर्वांगाला वेढून बसला असतानाच परशुरामाची भेदीक लावणी केदार बोडस गातात–

छबीदार सुरत गुलबरी
गेंद दोन उरी। नयनाची सुरी। जखम केली उरी

लावणी वाचयची नसते. ती गायली जाताना बघायची असते, अनुभवायची असते. ऐकणे तर होतंच असतं. लावणीचं लावण्य तनामनात असं भिनलं असताना यातून अशोक रानडे आपल्याला बाहेर कसं काढणार हा प्रश्न निदान मला तरी पडला होता. कारण लावणी बाकी सगळ्यांची कापणी करून टाकते. लावणीनंतर काही ऐकायला मनच तयार होत नाही, पण अशोक रानड्यांजवळ प्रभावी उतारा होता. त्यांनी हदग्याचे गीत सादर केले. कुण्या एकट्याचा पाड लावणीनंतर लागणं कठीणच होतं. हे हदग्याचं गीत समूह गीत होतं आणि त्यामध्ये शब्दांची- अर्थाची आतषबाजी नव्हती. होता ठेका. लावणीतल्या ढोलकीच्या नादासारखा, समूहाकडून उच्चारला जाणारा साधा सरळ ठेका. *'वईवरलं कारलं साजिरं ग, सई गोजिरं ग'* असे साधे शब्द, पण त्या ठेक्याने जणू ह्या शब्दांना ठोक्याचे बळ आले. त्यांनी लावणीचा प्रभाव संपवला आणि हा ठेकाच श्रोत्यांच्या मनात भिनला. हाही एक नवाच अनुभव होता. स्त्री संस्कृतीचे लक्षण असते आणि संस्कृतीचे रक्षणही करते. स्त्रिया आणि मुलांमुळे संस्कृती राहाते. आपल्याकडे समूह गीताची बरीच हेळसांड झालीय. एकीकडे भारतीय संगीतात पाश्चात्य संगीतात असलेला जोष-उल्हास नाही असं म्हणायचं. भारतीय संगीत सर्वांचं नाही, सर्वांना त्यात सहभागी होऊन आनंद लुटता येत नाही असं म्हणायचं आणि दुसरीकडे सर्वांना रमवणाऱ्या आपल्या लोकसंगीताची उपेक्षा करायची, असा प्रकार घडतोय. ह्या लोकसंगीतातून सर्वांना रमवू शकणारे, सर्वांनाच सहभागी होता येईल असे साधे, सोपे समर्थ संगीत निर्माण करता येईल, तरुण पिढीची गाण्या-नाचण्याची आवड पुरी करण्याचे सामर्थ्य ह्या लोकसंगीतात आहे, हे अशोक रानडे यांनी सहजपणे दाखवून दिले. हदग्याच्या समूह गाण्यानंतर वंदना कट्टीने आदिवासी आणि वारली पावसाची गाणी सादर केली. पुनःपुन्हा एकच कल्पना एकच ओळ येणारी ही गाणी आपली आपण धुंद होऊन म्हणायची गाणी होती. 'दुसऱ्यासाठी गायचं म्हणजे व्हरायटी लागते, स्वतःसाठी गाणं हे रमणं असतं.' अशोक रानडे यांनी शास्त्र सांगितलं. आंघोळ करताना आपण असं गाण्यात रमतो. एखादीच ओळ पुनःपुन्हा म्हणतो. आदिवासी असं रमणारा गाणं गातो. हे आदिवासीचं गाणंही आपल्या सगळ्यांचं गाणं होऊ शकतं. हदग्याचं गाणं समूह गीत होतं; आदिवासी, वारली गाणं हे रमणं होतं. त्यापाठोपाठ पट्टे बापूराव याचं 'लग्नाचं गीत' सादर झालं. लग्नाचा उत्साह-आनंद केवढा जिवंत केलाय ह्या गीतात पट्टे बापूरावांनी! मराठी गाण्यातून उत्साह आनंद सभ्यपणे सादर करता येतो त्यासाठी 'थेंब थेंब गाळायला' लागत नाही याचे हे मोठे आल्हादकारी दर्शन होते.

लग्न लागले माझे माझे।
बव्हले अंगणी साजे।
दारी चौघडा वाजे।
डंका छान छान छान।।

यातल्या 'माझे माझे, छान छान' ह्या पुनरुच्चाराने जी मजा आली ती अनुभवण्यासाठी हे गाणे समूहात सामील होऊन म्हणायलाच हवे. रात्रंदिन, जीवनमृत्यू आणि ऋतुचक्र या तिन्हींना अवतार कल्पनेने खूप काही दिलं आहे. ह्या अवतारातल्या आठव्या अवताराने तर स्वतःचे अत्यंत लोभसवाणे चित्र मानवी मनात उभे केले आहे. माणसाला आपण आहोत त्यापेक्षा वेगळं होणं यात समाधान वाटतं. कृष्णाने ह्या वेगळे होण्याला दुसरं होण्याला, खूप अवसर दिला. सर्व चक्राना पुसून टाकणारा, काळाचा ग्रास करणारा कृष्ण. ह्या कृष्णाला आपण खूप रंगवलंय. त्रिभंग कृष्ण महाराष्ट्रात विठ्ठलाच्या रूपाने अभंग कृष्ण झाला. संत कवींनी कृष्णलीला नानापरीने सांगितल्या. त्याला नाना नावे दिली. एकनाथांचा बाळकृष्ण, मुरलीरवाने मोहविणारा मोहन प्यारा, मराठी-गुजरातीमधून दिसणारी कृष्णाची नाना रूपे दाखवण्यासाठी एकापाठोपाठ एक मराठी, एक गुजराती अशी कृष्ण-गीतं अशोक

रानडे यांनी सादर केली. प्रीती भटने सर्व गुजराती गीते म्हटली. मराठी गीते वेगवेगळ्या मुलीनी सादर केली. कल्याणी पांडे हिने जनाबाईने लिहिलेले *'राधे तुला बोलावितो घोंगडीवाला'* हे गीत इतक्या प्रभावीपणे पेश केले की, आतापर्यंत कुणालाही मिळाल्या नव्हत्या एवढ्या टाळ्यांची अखंड बरसात काही वेळ झाली. जनाबाईचं हे गीत कधी तरी वाचलं होतं, पण प्रत्यक्ष गाण्यातून जेव्हा ते समोर उभं झालं तेव्हा त्या साध्याशा गीतातून अक्षरशः गोकुळ उभं झालं. आधी ऐकले होते, *'बाई ग हा वनमाळी आहे कानडा कपटी'* पण तरीसुद्धा ह्या घोंगडीवाल्याचा निरोप ऐकताच जणू राधा घरदार-संसार सोडून यमुनेकाठी निघाली... कल्याणी पांडेने ही आतूर झालेली राधा आणि तिला निरोप देणाऱ्या गोपीचा भाबडेपणा जिवंत केला. घोंगडीवालाच गळा वैजयंतीमाला घालून घेणारा विठू आहे, असे जनाबाईंनी या गीताच्या अखेरीस म्हणून विठ्ठल-कृष्णाचे एकरूपत्व मराठी संतपरंपरेला स्मरून सांगितलंय. मराठी माणूस-मराठी संस्कृती-मराठी भाषा यांच्यापाशी जपण्यासारखं, अभिमानाने मिरवण्यासारखं, आवर्जून सांगण्यासारखं जे काही आहे त्यात हा पंढरीचा विठ्ठल आणि त्याचा भक्तमेळा यांचा निश्चितच समावेश आहे–

राधे तुला पुसतो घोंगडीवाला
जमवुनी पोरे गेला यमुनेच्या तिरी
वाटीतो गोपाळकाला
राधे तुला पुसतो घोंगडीवाला–
रात्री माझ्या मंदिरी येऊन
निरोप सांगून गेला
राधे तुला निरोप सांगून गेला
राधे तुला पुसतो घोंगडीवाला

साधे, सोपे शब्द, सहजसुंदर रचना, पण अपार भक्तीने या सगळ्याला आलेली अलौकिक अशी झळाळी–

जनी म्हणे विठू हा आला
गळा वैजयंती माला
राधा तुला पुसतो घोंगडीवाला–

कल्याणी पांडेच्या स्वराने जणू त्या घोंगडीच्या अपार उबेत, तुळशीच्या मंगल गंधात तनमन विरघळून गेलं. ह्या मराठी-गुजराती कृष्णगीतांनी भारावलेल्या वातावरणातून बाहेर आणण्यासाठी अशोक रानड्यांनी एका वात्सल्य गीताची योजना केली होती. सुचित्रा बर्वेने सादर केलेल्या या वात्सल्य गीतात शब्दांपेक्षा वात्सल्यभावनेला मोल होतं. आपल्या बाळाबद्दलचे आईचे प्रेम कसे शब्दापलीकडचे असते ते दाखवणारं हे गाणं–

तान्ह्या रे तान्हिका, बाळा रे बाळिका
तुझ्या रे मुखाला लिंबलोणऽऽ
माझे तान्हे बाळ, देवाचे मंगळ
अमृताचे फळ संसाराचेऽऽ
गरीब माऊली कोठे बाळ लेणे

तरुण पिढीची गाण्या-नाचण्याची आवड पुरी करण्याचे सामर्थ्य ह्या लोकसंगीतात आहे, हे अशोक रानडे यांनी सहजपणे दाखवून दिले.

बाळाला वात्सल्याने वाढवीनऽऽ

संथ लय आणि आर्ततेचा आवेग असं अजब रसायन यामध्ये होतं. बाळाचं कौतुक करणारी अशी गीतं अनंत असतील या वात्सल्य गीतानंतर दिनरात्र चक्रातला अखेरचा टप्पा संध्या गीताने सुरू झाला. त्यासाठी भावगीत ह्या प्रकाराची अशोक रानडे यांनी योजना केली होती. पुन्हा एकदा कल्याणी पांडेने आपल्या आवाजाची आणि सहजसुंदर भाव व्यक्त करण्याची ताकद दाखवून दिली. गीत ग. दि. माडगूळकरांचे होते. संगीत सुधीर फडक्यांचे. दुधात साखर आणि केशराचा गंध रंग–

घण घण घंटा निनाद। गाई परत चालल्या
सरत चालला उजेड। लांब होत सावल्याऽ

नंतरच्या तांब्यांच्या *'तिन्ही सांजा सखे मिळाल्या'* ह्या गीताचे अवघडपण ह्या गीताच्या सोपेपणामुळे अधिक जाणवले. 'तिन्ही सांजा' सुचित्रा बर्वेने चांगले म्हटले. त्यानंतर माणिक वर्मांनी घराघरात बरसात केलेले शरदाचे चांदणे नंदा परचुरेने माणिकबाईंची आठवण ताजी करीत म्हटले. त्यानंतर ज्ञानेश्वरांची विराणी–

कृष्णे वेधिली विरहिणी बोले
चंद्रमा करीतो उबारा गे मायऽऽ

शोभा जोशीनी सादर केली. *'नंदनंदनु घडीघडी आणा'* अशी ओढ असलेली ही विराणी तेवढी मनाला भिडली नाही. कदाचित 'राधेचा घोंगडीवाला' मनोमनी ठसल्यामुळे असेल. दिनरात्र चक्रातली रात्र आली म्हणजे जीवनमृत्यू चक्रातली जीवनाची अखेरही आली. मराठी संतांनी ह्या जीवनाची नश्वरता अनेक तऱ्हेने दाखवून दिलीय. अशोक रानडे यांनी नरहरी सोनाराची एक रचना समूहगीतातून सादर करून थोडे वेगळे आपल्यापुढे ठेवले. चितारी भिंतीवर चित्र काढतो तसे हे जीवन आहे. केवळ जीवनच नव्हे सगळे विश्व, त्यात जगणारे आपण अवघे, हेसुद्धा त्या चित्रासारखेच आहोत, असं नरहरी म्हणतो–

चिताऱ्या चित्र काढी भिंतीवरी
तैसे हे सारे विश्वभोवती
तैसे जगणारे अवघे...

समूह गीताने ह्या सगळ्या बोधालाही एकप्रकारची खेळकर डूब दिली होती, त्यामुळे हे ऐकताना एक वेगळीच मजा जाणवत होती.

काही साध्य करा साधू संग धरा

हा ह्या सगळ्यातून सुटण्याचा नरहरीचा मार्ग कुणाला पटेल न पटेल पण समूह गीताची सहज लय, ठेका मात्र मनात ठसला. कार्यक्रमाची अखेर श्रुति सडोलीकरांच्या दोन गीतांनी झाली. मध्वमुनिश्वर आणि निळोबा यांच्या रचना श्रुतिनी म्हटल्या. सजणी लागली मजला नीज ही मध्वमुनिश्वरांची आणि 'आरती आर्त होते माझे मनी' ही निळोबांची. स्वरचक्र इथे संपले मात्र नाही, खरे तर ते इथे सुरू झाले असंच म्हणायला हवं.

अत्यंत मेहनतीने जुन्या रचनांची निवड करून एका सूत्रात त्या रचनांची मांडणी करून आणि त्यांचा जुना ढंग न विस्कटता नव्यांना जे हवे त्याचा विचार करून बसवलेला हा कार्यक्रम मराठी साहित्य संस्कृती आणि संगीत याची समृद्धता, सहजसुंदरता दाखवणारा होता, पण एन. सी. पी. ए. हे कार्यक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत जावेत अशी दृष्टी का ठेवत नाही? टाटा थिएटरमध्ये हा कार्यक्रम होणे हा खरोखरच भाग्ययोग होता, पण हे भाग्य फार थोड्यांच्या वाट्याला यावे हे मात्र दुर्भाग्यच म्हणावे लागेल. मराठी लोककला म्हटलं की, कोळीनृत्य आणि गीतांच्या जाळ्यातून सुटका नाही, असं वाटण्याइतपत वैताग दिला जातो. कुणीही उठावं, चार पोरी, पोरं जमवावी आणि गोमूला कशातही घोळवावी हा प्रकार चाललाय. सवंग बाजार गाणी बनवून ह्या गोमूला थिल्लरच नव्हे तर छिनालही बनवण्याचा धंदा सध्या होतोय. कोळीगीतं नृत्यांचा अस्सल बाज दुर्मिळ झालाय. अशोक रानडे यांनी लोकगीते आणि संत-शाहिरी रचना यातले वेचक हुडकून ते इतक्या कसदारपणे आपल्यापुढे आणलंय की आपण मराठी आहोत, याचा आनंद-अभिमान वाटावा. हे अधिकाधिक लोकांपुढे जायला हवं. समूह गीतांतला आनंद-उल्हास-उत्साह खळाळून तरुण मनापर्यंत पोहोचायला हवा. 'लग्न लागले माझे'चा डंका छान छान छान महाविद्यालयाच्या सहलीतून वाजायला हवा. 'वई वरलं साजिरं गोजिरं कारलं' मुलींच्या तोंडात घोळत राहायला पाहिजे. निरर्थक इंग्रजी गाण्यात गुंतलेल्या आपल्या तरुणतरुणींना मराठी रॅप, मराठी रॉक ॲण्ड रोल, मराठी पॉप निर्माण करण्याची चेतना देण्याची ताकद मराठी रचनेत, मराठी संगीतात आहे हे समजायला हवं. हे 'स्वरचक्र' सतत फिरावे, महाराष्ट्रभर फिरावे.

◆◆

A Tim
Every

Songs sung at different
year, such as the 'kl
resonate with a meanin
the moment. 'Swaracha
organised in Bomb
unravelled some of thes

Jessica J

'Ragini Vasanta', the melody motif of spring, is part of the Ragamala series, circa 1650 A.D.

MUSIC

ALMOST of us enjoy music without thinking much about its intimate connections with life. However, an unusual programme held last month in Bombay gave music lovers insights into just this by exploring musical responses to the interwoven cycles of birth and death, day and night and the seasons.

The brainchild of Dr Ashok Ranade, research director at the National Centre for the Performing Arts, Bombay, the programme, entitled *Swarachakra*, was jointly produced by the NCPA and the music department of SNDT University. Apart from faculty and students, professional singers like Shruti Sadolikar-Katkar and Shubha Joshi, former SNDT students, also took part.

The first item, a *bhupali*, traditionally sung in the morning, was followed by a number of other musical forms, such as the *lavni*, *bhav geet* and the *abhang*. There were songs about all kinds of feelings and occasions: marriage, religious festivals, the ecstasy of the monsoon, women's togetherness, maternal love, fear and acceptance of old age. Many songs had resonances in more than one cycle: morning songs that welcomed the birth of a new day also reminded one of spring and the beginning of life; evening songs evoked the dying day and led to reflections on mortality.

Most of the songs were in Marathi, but at one point Marathi and Gujarati songs about Krishna were juxtaposed to indicate some differences in the ways Krishna is viewed in the two cultures. It was interesting to see that these differences were reflected not only in the words but in the rhythms too. At the same time, one also felt that all differences in form, words and rhythm dissolve in Krishna. Ultimately, everything is one.

Swarachakra was first conceived when Dr Suma Chitnis, vice-chancellor of SNDT university, asked Dr Ranade in December 1992 to put up a special music programme at a conference of scholars of Maharashtrian history and culture. Once he decided on the framework, Dr Ranade selected the songs -- with the help of Sarla Bhide, head of SNDT university's music department -- auditioned singers, conducted rehearsals and also composed much of the music. "He was the *swarachakra* of it all," Ms Bhide recalls with a smile.

"All Indian culture," says Dr Ranade, "is governed by its response to the three cycles of birth-death, day-night and the seasons. Take any area you like -- smells, dress, colours, songs. Relate it to these cycles and you will get an insight into what Indian culture has been thinking about, not only in the last hundred years, but in the last two thousand. In this case, I chose mostly Maharashtrian songs and forms, but one can

50 A.D.

rms, such as the *lavni*, and the *abhang*. There about all kinds of feel- casions: marriage, reli- vals, the ecstasy of the women's together- ernal love, fear and of old age. Many resonances in more cycle: morning songs med the birth of a new eminded one of spring eginning of life; even- evoked the dying day to reflections on

A Time For Every Music

Songs sung at different times of the day or year, such as the 'khayal' or 'lavni', resonate with a meaning that is organic to the moment. 'Swarachakra', a programme organised in Bombay last month, unravelled some of these allusions, reports Jessica Jacob

Ashok Ranade

mortality.

Most of the songs were in Marathi, but at one point Marathi and Gujarati songs about Krishna were juxtaposed to indicate some differences in the ways Krishna is viewed in the two cultures. It was interesting to see that these differences were reflected not only in the words but in the rhythms too. At the same time, one also felt that all differences in form, words and rhythm dissolve in Krishna. Ultimately, everything is one.

Swarachakra was first conceived when Dr Suma Chitnis, vice-chancellor of SNDT university, asked Dr Ranade in December 1992 to put up a special music programme at a conference of scholars of Maharashtrian history and culture. Once he decided on the framework, Dr Ranade selected the songs -- with the help of Sarla Bhide, head of SNDT university's music department -- auditioned singers, conducted rehearsals and also composed much of the music. "He was the *swarachakra* of it all," Ms Bhide recalls with a smile.

"All Indian culture," says Dr Ranade, "is governed by its response to the three cycles of birth-death, day-night and the seasons. Take any area you like -- smells, dress, colours, songs. Relate it to these cycles and you will get an insight into what Indian culture has been thinking about, not only in the last hundred years, but in the last two thousand. In this case, I chose mostly Maharashtrian songs and forms, but one can do the same thing for other regional cultures too."

Even before *Swarachakra*, Dr Ranade had been putting up innovative programmes such as *Dev Gani* (songs about God) and *Sangeet Rang* (colour in music). Though he had a thoroughly traditional grounding in classical music (his gurus included Gajanandbua Joshi and Professor B. R. Deodhar) and had been a practising musician for years, it wasn't until 1975 that his thinking about Indian music took a different direction.

"I began to feel that there was too much concentration on art music," Dr Ranade says. "To understand Indian music, you have to consider five categories -- primitive music, folk music, devotional music, popular music and art music. Only then will you see that music has very close connections with life and culture. *Swarachakra* is one more attempt to put music in a larger cultural perspective, to show that music is not something that can be produced only with fine instruments and beautiful voices. Music isn't only about *raga* grammar. Music is important because it has connections with people's everyday lives."

"All Indian culture is governed by its response to the three cycles of birth-death, day-night and the seasons."

Such a perspective, Dr Ranade feels, provides a fresh and expansive insight into music. "For instance, an Adivasi song that moves in only four notes is as important and beautiful as a *khayal* which employs all twelve. Its universe is self-sufficient, complete. That song is saying something valid and significant and my ears will be as eager to listen to it as to a *khayal* or *thumri*."

Dr Ranade, who has also been associated with innovations in theatre, is studying how songs can be indicators of cultural change. "In the late 18th century," he says, "Honaji Bala, a cowherd, started composing songs in *raga* and *tala*. Around the same time, Ram Joshi, a Brahmin from a family of priests, began singing songs from *tamashas*. Clearly, they did this because the music they inherited was not giving them what they needed. By year end I hope to come up with a programme that explores such changes."

While the idea may sound dauntingly complex, one can be sure that, enlivened by Dr Ranade's informative and humorous commentary, the programme will be as enlightening as *Swarachakra*. It will also show once again how fruitful and dynamic the relation between research and performance can be.

50 A.D.

rms, such as the *lavni*, and the *abhang*. There s about all kinds of feel- ccasions: marriage, reli- vals, the ecstasy of the women's together- ernal love, fear and of old age. Many resonances in more cycle: morning songs med the birth of a new eminded one of spring ginning of life; even- evoked the dying day to reflections on

A Time For Every Music

Songs sung at different times of the day or year, such as the 'khayal' or 'lavni', resonate with a meaning that is organic to the moment. 'Swarachakra', a programme organised in Bombay last month, unravelled some of these allusions, reports Jessica Jacob



Ashok Ranade

mortality.

Most of the songs were in Marathi, but at one point Marathi and Gujarati songs about Krishna were juxtaposed to indicate some differences in the ways Krishna is viewed in the two cultures. It was interesting to see that these differences were reflected not only in the words but in the rhythms too. At the same time, one also felt that all differences in form, words and rhythm dissolve in Krishna. Ultimately, everything is one.

Swarachakra was first conceived when Dr Suma Chitnis, vice-chancellor of SNDT university, asked Dr Ranade in December 1992 to put up a special music programme at a conference of scholars of Maharashtrian history and culture. Once he decided on the framework, Dr Ranade selected the songs -- with the help of Sarla Bhide, head of SNDT university's music department -- auditioned singers, conducted rehearsals and also composed much of the music. "He was the *swarachakra* of it all," Ms Bhide recalls with a smile.

"All Indian culture," says Dr Ranade, "is governed by its response to the three cycles of birth-death, day-night and the seasons. Take any area you like -- smells, dress, colours, songs. Relate it to these cycles and you will get an insight into what Indian culture has been thinking about, not only in the last hundred years, but in the last two thousand. In this case, I chose mostly Maharashtrian songs and forms, but one can do the same thing for other regional cultures too."

Even before *Swarachakra*, Dr Ranade had been putting up innovative programmes such as *Dev Gani* (songs about God) and *Sangeet Rang* (colour in music). Though he had a thoroughly traditional grounding in classical music (his gurus included Gajanandbua Joshi and Professor B. R. Deodhar) and had been a practising musician for years, it wasn't until 1975 that his thinking about Indian music took a different direction.

"I began to feel that there was too much concentration on art music," Dr Ranade says. "To understand Indian music, you have to consider five categories -- primitive music, folk music, devotional music, popular music and art music. Only then will you see that music has very close connections with life and culture. *Swarachakra* is one more attempt to put music in a larger cultural perspective, to show that music is not something that can be produced only with fine instruments and beautiful voices. Music isn't only about *raga* grammar. Music is important because it has connections with people's everyday lives."

"All Indian culture is governed by its response to the three cycles of birth-death, day-night and the seasons."

Such a perspective, Dr Ranade feels, provides a fresh and expansive insight into music. "For instance, an Adivasi song that moves in only four notes is as important and beautiful as a *khayal* which employs all twelve. Its universe is self-sufficient, complete. That song is saying something valid and significant and my ears will be as eager to listen to it as to a *khayal* or *thumri*."

Dr Ranade, who has also been associated with innovations in theatre, is studying how songs can be indicators of cultural change. "In the late 18th century," he says, "Honaji Bala, a cowherd, started composing songs in *raga* and *tala*. Around the same time, Ram Joshi, a Brahmin from a family of priests, began singing songs from *tamashas*. Clearly, they did this because the music they inherited was not giving them what they needed. By year end I hope to come up with a programme that explores such changes."

While the idea may sound dauntingly complex, one can be sure that, enlivened by Dr Ranade's informative and humorous commentary, the programme will be as enlightening as *Swarachakra*. It will also show once again how fruitful and dynamic the relation between research and performance can be.

सुधीर दामले

अशोक रानडे स्वतंत्रपणे कार्यक्रम करणार!

संगीत क्षेत्रात सुसूत्र, नावीन्यपूर्ण, रंजक, रेखीव कार्यक्रम सादर करण्याबद्दल प्रा. अशोक रानडे यांची विशेष ख्याती आहे. ते स्वतः जाणकार, मर्मज्ञ कलाकार असल्यामुळे प्रेक्षकांपुढे नेमके काय सादर करायचे याचे भान त्यांना पूर्णतः असते, त्यामुळे गेल्या काही वर्षांत त्यांनी नाट्य संगीताचे अनेकविध कार्यक्रम जसे सादर केले तसेच बैठकीची लवणी, देवगाणी असेही नावीन्यपूर्ण संगीत कार्यक्रम सादर करून रसिकांची वाहवा मिळवली आहे. एन.सी.पी.ए.सारख्या प्रतिष्ठित संस्थेने हे कार्यक्रम सादर केल्यामुळे या सर्वच कार्यक्रमांना एक दर्जा प्राप्त झाला होता. अर्थात एन. सी. पी. ए. काही धंदेवाईक संस्था नव्हे की असे कार्यक्रम व्यावसायिकदृष्टीने पेश करण्याची इच्छा त्यांनी धरावी! त्यामुळे अगदी मोजकेच कार्यक्रम सादर झाले. रसिकांची सतत मागणी येऊनही अनेक अडचणींमुळे हे कार्यक्रम मुंबईबाहेरही होऊ शकले नाहीत. रसिकांची मागणी ध्यानात घेऊन, कलाकारांच्या श्रमाचे चीज व्हावे या उद्देशाने अशोक रानडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आता स्वतंत्रपणे व्यावसायिकदृष्टीने हे असे संगीतविषयक कार्यक्रम सादर करण्याचे ठरविले आहे. अशोक रानडे एन. सी. पी. ए.मध्ये संशोधन विभागात पूर्वीच्याच जागेवर काम करीत असले तरी कार्यक्रम सादर करताना यापुढे एन. सी. पी. ए.च्या बॅनरऐवजी ते अन्य संस्थेचा बॅनर घेतील असे समजले. लवकरच त्यांची अशा तऱ्हेची नवी निर्मिती 'सावन' या नावाखाली सादर होणार असून या अभिनव कार्यक्रमाची संकल्पना, दिग्दर्शन या गोष्टी स्वतः अशोक रानडेच सांभाळणार आहेत.

या कार्यक्रमाच्या नावावरून या कार्यक्रमात पावसाची गाणी सादर होणार हे उघड असले तरी त्यात अत्यंत नावीन्य, वैविध्य असेल ही गोष्ट मुद्दाम सांगण्याची गरजच नाही. या गाण्यांचे निरुपण स्वतः अशोक रानडे करणार असून प्रभाकर कारेकर, अजय पोहनकर, सरला भिडे, श्रुती सडोलीकर, सुरेश बापट, मंजुषा कुलकर्णी हे जानेमाने कलाकार पावसाच्या गाण्यांचे विविध प्रकार सादर करणार आहेत. १४ ऑगस्ट ९३ रोजी हा कार्यक्रम रंगशारदाच्या सभागृहात सादर होईल. त्याचवेळी या गाण्यांचा समावेश असणारी ध्वनिफीतही (दोन भागातली) प्रकाशित करण्यात येणार आहे. आजवर अशोक रानडे यांनी जे विविध कार्यक्रम सादर केले आहेत तेही आता मुंबईत आणि मुंबईबाहेर व्यावसायिक पद्धतीवर पुन्हा नव्याने आणि मुक्तपणे सादर होतील, हीच गोष्ट रसिकांच्या दृष्टीने मोठी आनंदाची ठरणार आहे.

अस्सल 'फुलराणी'चे पुनरागमन

जुनी नाटके पुन्हा नव्या हुरुपाने, मोठ्या थाटामाटात रंगभूमीवर आणण्याबद्दल 'सुयोग'च्या सुधीर भटांची ख्याती आहे. आचार्य अत्रे यांची अनेक नाटके त्यांनी जशी सादर केली तशाच उत्साहात अलीकडे जयवंत दळवी यांचे 'संध्याछाया'ही पुन्हा नव्या संचात सादर केले. सुधीर भट यांचा जुनी नाटके नव्या संचात सादर करण्याचा आग्रह पाहून आज तरी ते नाट्यसृष्टीत पुनरुज्जीवित नाटकांचे निर्माते म्हणूनच ओळखले जातात. आता सुधीर भट यांनी लवकरच पु. ल. देशपांडे यांचे सुविख्यात नाटक 'ती फुलराणी' पुन्हा नव्याने सादर करण्याचे ठरविले असून ऑगस्टअखेरीस ही 'फुलराणी' नव्या हुरुपात, नव्या ढंगात सादर करण्याचा त्यांचा मनोदय आहे. 'फुलराणी'चे नाव निघाले की, अर्थातच मराठी नाट्यरसिकांना भक्ती बर्वे यांचा विसर कसा पडेल? त्यामुळे या नव्या फुलराणीतही भक्ती बर्वेचा समावेश असणे अपरिहार्य ठरते?

सतीश दुभाषी जी भूमिका करीत ती प्रा. जहागिरदारांची भूमिका आता संजय मोने करणार असून त्यांच्या जोडीने अनिल क्षीरसागर हा गुणी कलाकारही प्रेक्षकांपुढे येणार आहे. राजा नाईक या नाटकातली आपली पेटंट भूमिका पुन्हा नव्या हुरुपाने करणार असून इतरही अनेक गुणी कलाकार या नाटकात कामे करणार आहेत. दिलीप कोल्हटकरांसारखा हुरहुन्नरी दिग्दर्शक या नाटकाचा 'मानद दिग्दर्शक' म्हणून काम पाहणार आहे. भक्ती बर्वेच्या अफलातून ग्रेट अभिनयाने स्मरणीय झालेली फुलराणी रंगमंचावर पुन्हा अवतरणार याचा रसिकांना खात्रीने आनंदच होईल!

सुरेश खऱ्यांचे रौप्यमहोत्सवी नाटक

सुप्रसिद्ध नाटककार सुरेश खरे यांचे रौप्यमहोत्सवी नाटक 'तिची कथाच वेगळी' नुकतेच रंगभूमीवर आले आहे. सत्तावीस वर्षांत पंचवीस नाटके लिहिणारे सुरेश खरे हे आज नाट्यसृष्टीतील केवळ नाटककार म्हणूनच प्रसिद्ध नाहीत, तर विविध प्रकारचे कार्यक्रम मोठ्या कल्पकतेने सादर करणारे एक लोकप्रिय संयोजक, नाट्य दिग्दर्शक आणि व्हिडीओ चित्रफिती तयार करणारे दिग्दर्शक-निर्माते म्हणूनही प्रसिद्ध आहेत. इतके सर्व विविध प्रकारचे व्याप सांभाळून खरे व्यावसायिक रंगभूमीसाठी नाटके कशी लिहितात याचे अनेकांना कोडे आहे पण एकाच वेळी अनेक गोष्टी यशस्वीपणे हाताळण्याची क्षमता असल्यामुळे खरे या सर्व गोष्टीत प्रावीण्य संपादन करून राहिले आहेत! आकर्षक, मनोवेधक कथावस्तू, अकृत्रिम बांधणी आणि समर्थ-प्रभावी संवाद ही खऱ्यांच्या नाटकाची वैशिष्ट्ये मानण्यात येतात. या बलस्थानामुळे त्यांनी गेल्या सत्तावीस वर्षांत २५ नाटके लिहिली. प्रायोगिक रंगभूमीने व्यावसायिक रंगभूमीला विविध क्षेत्रातली गुणी माणसे दिली. सुरेश खरे हे त्यातलेच एक नाटककार! १९६६ साली 'सागर माझा प्राण' हे नाटक त्यांनी राज्य नाट्य स्पर्धेसाठी लिहिले होते. त्यानंतर 'कांचेचा चंद्र', 'मला उत्तर हवंय' ही दोन नाटके प्रथम राज्य नाट्य स्पर्धेतच सादर झाली. या पंचवीस नाटकांपैकी ३/४ नाटके सोडली तर बहुतेक सर्व नाटके व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी ठरली असेच दिसून येईल. 'मला उत्तर हवंय.' 'काचेचा चंद्र' सारख्या नाटकांनी तर प्रचंड लोकप्रियता मिळवली. 'संकेत मीलनाचा' आणि 'कुणीतरी आहे तिथे' या नाटकांनीही लोकप्रियता मिळवली आहे. सत्तावीस वर्षांत पंचवीस नाटके लिहिली असली तरी जवळजवळ सहा वर्षे त्यांनी नाट्यलेखन केले नव्हते हे लक्षात घेतले तर एकोणीस वर्षात पंचवीस नाटके लिहिण्याची किमया त्यांनी केली आहे, असेच म्हटले पाहिजे. अजूनही अनेक नाटकांची कथानके त्यांच्या डोक्यात घोळत आहेत! ❑